महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, श्रीकृष्णपेठ, अमरावती, महाराष्ट्र - ४४४ ६०१

वेबसाईट : gmcamravati.org फोन नं.0721-2993171

जा.क्र.शावैमअ/वि.वे./थेट मुलाखत/व.नि./ता.नि./1459-62/२५ दिनांक : 20/01/२०२५

## थेट मुलाखत

## Walk-in-Interview

विषय : वरिष्ठ निवासी (सेवा) संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने १२० दिवसांकरीता भरणे करीता थेट मुलाखत आयोजित करण्याबाबत...

संदर्भ : शासन निर्णय क्र:- पदनि-२०२३/प्र.क्र.१८६/२३ वैसेवा-२ दिनांक : ०६ मार्च, २०२४.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेतील विविध विषयातील वरिष्ठ निवासी (सेवा) या संवर्गातील मंजुर पदांपैकी रिक्त असलेली व राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार आवश्यक पदे वरिष्ठ कार्यालयाकडुन बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत स्थानिक निवड मंडळा मार्फत निव्वळ १२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता थेट मुलाखत आयोजित करण्यात येत आहे. विभागनिहाय रिक्त पदांचा तक्ता, अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता, अटी व शर्थी व इतर माहितीदर्शक तक्ता सोबत जोडला आहे तसेच सदर जाहिरात संस्थेचे संकेतस्थळ gmcamravati.org वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**थेट मुलाखत दिनांक व वेळ : दर मंगळवार व बुधवार, सकाळी ११.०० वा. ते ०१.०० वा. पर्यंत.**
**स्थळ : मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे दालन.**

तरी पात्र उमेदवारांनी वरिष्ठ निवासी (सेवा) पदाकरीताचा अर्ज परिपुर्ण भरुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट साक्षांकीत छायाप्रतींच्या व्दिप्रतीसह उपरोक्त नमुद वार व वेळेत वरिष्ठ निवासी पदाकरीता थेट मुलाखतीस (Walk-In-Interview) उपस्थित राहावे.

(डॉ.किशोर इंगोले)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.

प्रत,
१. संस्थेच्या संकेतस्थळ gmcamravati.org वर प्रसिध्द करणेकरीता.
२. नोटीस बोर्ड - महाविद्यालय/रुग्णालय/ग्रंथालय/विभाग........

**प्रत माहितीस सविनय सादर,**
१) मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई
२) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.